# संस्थाचालक संघटना बैठकीचे इतिवृत्त दि. ०९/१०/२०१९

| अ.क. | सर्वसाधारण विषय | करावयाच्या कार्यवाहीचा तपशील | कार्यवाही कोणत्या स्तरावर | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १. | संच मान्यता ३ वर्षातून एकदा करणेबाबत. | दरवर्षी होणाऱ्या संच मान्यतेमुळे पटसंख्येआभावी शिक्षक अतिरिक्त होतात. त्यामुळे दरवर्षी संचमान्यता न करता ३ वर्षातून करावी. जेणेकरुन जास्तीत जास्त विद्यार्थी शाळेत प्रवेशीत करण्याची संधी मिळेल व दरवर्षी शिक्षक अतिरिक्त होणार नाहीत.<br>सन २०१९-२० या वर्षीच्या संचमान्यतेस शासनाकडून स्थगिती देण्यात आली आहे. संच मान्यता ३ वर्षातून एकदा करणे ही धोरणात्मक बाब आहे. संघटनेने सविस्तर निवेदन शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावे. शासनस्तरवर सादर करणेत येईल. | शासन स्तरावरील | -- |
| २. | विभागातील शाळांची सॅंपल सर्व्हे करुन शाळा तपासणी शिक्षणाधिकारी यांचेकडून व्हाव्यात. | राज्यमंडळाकडे दाखल करण्यात येणाऱ्या काही प्रस्तावांमध्ये शाळा तपासणी अहवालाची मागणी करणेत येते.<br>शिक्षणाधिकारी यांचेकडून नियमित शाळा तपासणी होत नसल्यामुळे गुणवत्तेवर परिणाम होत असलेबाबत संघटनेकडून सांगण्यात आले.<br>शिक्षणाधिकारी/ उपशिक्षणाधिकारी यांनी प्रत्येक वर्षी ४० व गटशिक्षणाधिकारी यांनी प्रत्येक वर्षी २० शाळांची तपासणी करणे आवश्यक आहे. परंतु, विभागात वर्ग-१ व वर्ग-२ च्या असणाऱ्या रिक्त पदांमुळे शाळा तपासणी करण्याबाबत अडचणी निर्माण होत आहेत.<br>संघटनेने रिक्त असणाऱ्या वर्ग-१ व २ अधिकाऱ्यांची पदे भरण्याबाबत तसेच नियमित शाळा तपासणी होणेबाबत राज्यस्तरीय बैठकीमध्ये चर्चा करावी. | -- | -- |
| ३. | शासनाकडून येणारे अनुदान जास्तीत जास्त शाळांना मिळावे शक्यतो परत जावून नये. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी अनुदान वितरणाबाबत योग्य ते नियोजन करुन शासन अनुदान सर्व शाळांना पोहोचतील याबाबत दक्षता घ्यावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४. | थकित वेतनेतर अनुदान शाळांना मिळण्यासाठी प्रयत्न करावा. | कोल्हापूर जिल्ह्यातील ९५ टक्के शाळांचे वेतनेतर अनुदान हे संबंधतीत शाळांच्या खात्यावर वर्ग करण्यात आले आहे. ५४ शाळांच्या तांत्रिक कारणामुळे प्रलंबित आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील | शासन स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रलंबित शाळांचे वेतनेतर अनुदान वितरणाबाबतची कार्यवाही माहे-नोव्हेंबर अखेर पर्यंत होईल.<br>सद्यस्थितीतील वाढती महागाई याचा विचार करता मिळणारे वेतनेतर अनुदान हा अपुरा आहे. त्यामुळे वेतनेतर अनुदान वाढवून मिळावे अशी मागणी करण्यात आली.<br>ही धोरणात्मक बाब असल्यामुळे संघटनेने शिक्षण उपसंचालक कार्यालयास सादर करावे. कार्यालय स्तरावरुन आपले निवेदन शासनास सादर करण्यात येईल. | | |
| ५. | पेन्शन प्रस्ताव नियमितपणे तपासून पुढे पाठवावेत. | कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीबाबतचे सर्व लाभ हे कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीच्या दिवशी मिळणे अपेक्षीत आहे. यासाठी कर्मचारी सेवानिवृत्त होण्याच्या सहा महिन्याआधी सेवानिवृत्ती प्रस्ताव अधीक्षक, वेतन पथक कार्यालयात येणे अपेक्षीत आहे.<br>याबाबत अधीक्षक, वेतन पथक यांनी शाळेकडून वेतन देयके स्विकारताना त्या-त्या वर्षी निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी शाळेकडून उपलब्ध करुन घ्यावी. त्याप्रमाणे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सहा महिने आधी सेवानिवृत्तीबाबत प्रस्ताव शाळेस सादर करण्याच्या सूचना निर्गमित कराव्यात. जेणेकरुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास सेवानिवृत्तीचे लाभ हे वेळेत मिळातील. | शिक्षणाधिकारी / वेतन पथक स्तरावर | -- |
| ६. | आदर्श शिक्षण संस्थांच्या आदर्श शाळांना पुरस्कार मानपत्र द्यावेत. | वसंतराव देवाळे हायस्कूलचा निकाल हा गेल्या १७ वर्षापासून १०० टक्के आहे. महाराष्ट्र हायस्कूल व ज्यु कॉलेजचे विद्यार्थी हे गेली ५० वर्षे सातत्याने राष्ट्रीय पातळीवर खेळत आहेत. क्रिडा क्षेत्रात प्राविण्य मिळवत आहेत.<br>अशा काही विशेष प्राविण्य असलेल्या शाळांना संस्थांना प्रोत्साहन मिळण्याबाबत शिक्षण उपसंचालक स्तरावरुन शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. | शासन स्तरावर | -- |
| ७. | मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद निर्णयानुसार अनुदानित शाळांतील विनाअनुदानित तुकडीवर काम करणाऱ्या शिक्षकांना अनुदानित शाळेवर बदलीकेलेनंतर मान्यता मिळणेबाबत. | सर्व शिक्षणाधिकारी यांनी शासन निर्णय दिनांक २६ जून २०१६ नुसार कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी स्तरावर | |
| | **आयत्यावेळचे विषय :-** | | | |
| १. | आरटीई प्रमाणपत्र दर ३ वर्षांनी सादर करण्याऐवजी ५ | दर ३ वर्षांनी आरटीई प्रमाणपत्र सादर करण्याची अट ही वाढवून | शासन स्तरावर | -- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वर्षांनी सादर करणेबाबत. | ५ वर्षे करावी अशी संघटनेकडून मागणी करण्यात आली.<br>ही धोरणात्मक बाब आहे. संघटनेने निवेदन सादर करावे. | | |
| २ | रजा कालावधीतील नियुक्ती | सातारा जिल्हयात रजा कालावधीतील नियुक्ती देण्यात येत नाही. प्रसुती रजा असाध्य रोगासाठी दिर्घ रजेवर असणाऱ्या रजा कालावधीत ही नियुक्ती करण्यात येते.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. सातारा यांनी दि. ७ नोव्हेंबर २०१७ शासन निर्णयान्वये कार्यवाही करावी. | शिक्षणाधिकारी (माध्य.) जि.प.सातारा | -- |
| ३ | जिल्हा स्तरावर संस्था चांलकांची बैठक होत नसल्याबाबत | जिल्हास्तरावर संस्था चालक संघटनेच्या नियमित बैठका होत नसल्याबाबत संघटनेकडून नमूद करण्यात आले.<br>सर्व शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तवर नियमित संस्था चालकांच्या बैठका आयोजित कराव्यात. | शिक्षणाधिकारी स्तरावर | -- |
| ४ | शिक्षक भरती मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मार्गदर्शक तत्त्वानुसार व्हावी. | शिक्षक भरती मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मार्गदर्शक तत्त्वानुसार व्हावी अशी संघटनेकडून मागणी कण्यात आली.<br>संघटनेने याबाबत शिक्षण उपसंचालक कार्यालयास सविस्तर अहवाल सादर करावे. | संघटना स्तरावर | -- |
| ५ | वसंतराव देशमुख माध्यमिक शाळा, कोल्हापूर शाळेतील नैसर्गिक वाढीने मंजूर होणाऱ्या तुकडीस अनुदान मिळणेबाबत. | शिक्षण उपसंचालक कार्यालय स्तरावर प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प.कोल्हापूर यांनी शिक्षण उपसंचालक कार्यालयास प्रस्ताव सादर करावा. | शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प.कोल्हापूर | -- |
| | **सर्वसाधारण सूचना :-** | | | |
| | संघटना अधिकृत असलेला पुरावे सादर करणे. | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. ०२ जानेवारी २०१७ नुसार आपली संघटना अधिकृत असलेबाबचे पुरावे सादर करावे. अधिकृत असलेल्या संघटनेचीच बैठक पुढे आयोजित करण्यात येईल. | संघटना स्तरावर | -- |

**(सत्यवान सोनवणे)**
**शिक्षण उपसंचालक**
**कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**